जनसंपर्क अधिकारी कार्यालय,पुणे शहर पोलीस
P.R.O. Office, Crime Branch, Pune City
**Address** – Office of The Commissioner of Police, Pune City Sadhu Vaswani Road, Pune
Maharashtra – 411001
**E-Mail ID** : crimepress.pune@gov.in **Ph.**020 / 26122478

**प्रेसनोट क्रमांक - ११८ दिनांक -१७/०२/२०२४**

सायबर पोलीस स्टेशन, पुणे शहर

## ससून हॉस्पीटलमधुन पळुन गेलेल्या सायबर पोलीस स्टेशनच्या आरोपीस अटक केलेबाबत.

सायबर पोलीस स्टेशन, पुणे शहर येथील गुरनं ७९/२०२४, भादंवि कलम ५००, ५०४, ५०६, ५०९ सह माहिती तंत्रज्ञान कायदा कलम ६७ या गुन्हयातील फिर्यादीस उद्देशून रिल्स पोस्ट केलेवरुन सदरचा गुन्हा दाखल करण्यात आला आहे.

सदर गुन्हयामध्ये इन्स्टाग्राम कंपनीकडून प्राप्त माहितीच्या तांत्रिक विश्लेषणावरून दिनांक ०९/०२/२०२४ रोजी आरोपी नामे **मार्शल लुईस लीलाकर, वय २४ वर्षे, रा. आकुर्डी, पुणे** यास सदर गुन्हयात अटक करण्यात आली होती. आरोपीताचा गुन्हयातील सक्रीय सहभाग निष्पन्न झाल्याने इन्स्टाग्राम आयडी ज्या मोबाईल मधून तयार केला तो मोबाईल फोन त्याच्याकडून हस्तगत करण्यात आला. तसेच आरोपीताकडे गुन्हयाचे अनुषंगाने तपास करणेकरीता पोलीस कोठडी घेण्यासाठी मा.न्यायालयात हजर केले असता मा. न्यायालयाने आरोपीताची दि. १३/०२/२०२४ रोजी पर्यंत पोलीस कोठडी रिमांड मंजूर केली होती. नमुद आरोपी पोलीस कोठडीत असताना दिनांक ११/०२/२०२४ रोजी वैदयकीय तपासणी करीता ससून हॉस्पीटल येथे नेले असता तो ससुन रुग्णालयातून पळुन गेला.

आरोपी पळून गेलेबाबत बंडगार्डन पोलीस स्टेशन, पुणे शहर येथे गु.र.नं. ४४/२०२४ भा.दं.वि. कलम २२४ प्रमाणे गुन्हा दाखल करण्यात आला आहे. तसेच आरोपीताचा शोध घेणेकामी सायबर पोलीस स्टेशन व गुन्हे शाखेची १० पथके तयार केली होती. काही पथके आरोपीताचे मागावर, रेल्वे सीसीटिव्ही फुटेज पाहण्याकरीता, तसेच आरोपीताचे नातेवाईकांकडे (कात्रज, निगडी, आकुर्डी इ.) व आरोपीताची मैत्रिणीकडे एक टिम तसेच आरोपीताचा माग काढण्या करीता लोणावळा, कर्जत, कल्याण येथे देखील काही टीम रवाना केल्या होत्या. सदर शोध कार्यास दिनांक १७/०२/२०२४ रोजी यश मिळाले असून आरोपीताचे मावशीच्या घरी येरवडा, पुणे येथे पाळत ठेवून असणारे पोलीस अंमलदार नागटीळक व महिला पोलीस अंमलदार सोनवणे यांस सदर आरोपी त्या परिसरात आल्याचे दिसल्याने त्यास ताब्यात घेण्यात आले आहे व नमुद आरोपीतास पुढील कार्यवाहीसाठी बंडगार्डन पोलीस स्टेशनच्या ताब्यात देण्यात आले आहे. या तपास पथकामध्ये पोलीस निरीक्षक अजय वाघमारे, पोलीस निरीक्षक सोमनाथ जाधव, पो.उप.नि.रसाळ, पो.उप.नि.मगदुम, पो.उप.नि.पाटोळे व स.पो.नि.पाडवी यांनी भाग घेतला होता.

सदरची कारवाई मा.पोलीस आयुक्त, पुणे शहर श्री.अमितेश कुमार, मा.पोलीस सह आयुक्त, पुणे शहर, श्री. प्रविण पवार, मा.अपर पोलीस आयुक्त, गुन्हे, श्री. शैलेश बलकवडे, मा.पोलीस उपआयुक्त, आर्थिक व सायबर गुन्हे, श्री. विक्रांत देशमुख, मा.पोलीस उप आयुक्त, गुन्हे शाखा, श्री.अमोल झेंडे, सहाय्यक पोलीस आयुक्त, आर्थिक व सायबर गुन्हे मा.आर.एन.राजे, मा.सहायक पोलीस आयुक्त, गुन्हे शाखा १ श्री.सुनिल तांबे, यांचे मार्गदर्शनाखाली सायबर पोलीस स्टेशन, पुणे शहर येथील वरिष्ठ पोलीस निरीक्षक श्रीमती मिनल सुपे-पाटील, पोलीस निरीक्षक विजय खोमणे व सायबर पोलीस स्टेशन कडील तसेच गुन्हे शाखेकडील शोध पथकातील सर्व अधिकारी व अंमलदार यांनी सदर शोध मोहिम यशस्वी रित्या पार पाडली आहे.